60[A]

लेखापरीक्षण विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र. मुलेप/ ९४६८
दिनांक: १०/१०/२०१९

मा.मुख्य कामगार अधिकारी ,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस..

**विषय : –: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६० (अ) अन्वये जाहीर करावयाची इकडील कार्यालयाकडील माहे सप्टेंबर २०१९ अखेरची माहिती.**

संदर्भ : १) आमचे कार्यालयाकडील जा.क्र.मुलेप/२३० दि.२७.७.२०१० चे पत्र.
२) मा. अति. महापालिका आयुक्त (ज) यांचे पत्र क. अतिमआ(ज)/सका/१७८ दि. ०२/०६/२०१२.
३) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र जा.क्र.मआ/२८२ दि.१२.०८.२०१४.
४) आपले कार्यालयाकडील जा.क्र. एलओ/४३८३ दि.०७.१०.२०१९ व वेळोवेळी काढण्यात आलेली कार्यालय परिपत्रके.

संदर्भ क्र.१ते ३ ने आमचे कार्यालयाकडील यापूर्वी माहिती पाठविण्यात आलेली आहे.संदर्भ क्र.४ चे पत्राने कळविल्यानुसार माहे सप्टेंबर २०१९ पर्यन्तची माहिती अद्ययावत करुन पाठवित आहोत.तसेच सदरची माहिती मनपा वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कळावे.

(अंबरीष गालिंदे)
सह महापालिका आयुक्त
(मुख्य लेखापरीक्षक)
पुणे महानगरपालिका

60[A]

मा. मुख्य कामगार अधिकारी,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस..

**विषय : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६० (अ) अन्वये विनिर्दि ष्ट माहिती प्रकटीकरण सप्टेंबर २०१९ अखेरची माहिती.**

संदर्भ : १) आपले कार्यालयाकडील जा.क्र.सका/२२८ दि.१९.०६.२०१३.

२) मा.महापालिका आयुक्त जा.क्र.मआ/२८२ दि.१२.०८.२०१४.

३) आपले कार्यालयाकडील जा.क्र. एलओ/४३८३ दि.०७.१०.२०१९ व वेळोवेळी काढण्यात आलेली कार्यालय परिपत्रके.

विषयांकित प्रकरणी इकडील कार्यालयाकडील माहिती खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | कलम ६० (अ) | माहिती |
|---|---|---|
| १. | महानगरपालिकेचा तपशील | मुख्यलेखापरीक्षक कार्यालयाचा आस्थापना विभाग स्वतंत्र आहे. मा. स्थायी समितीच्या अधिपत्याखाली सदर कार्यालय येते.या विभागाचे मुख्यलेखापरीक्षक हे खातेप्रमुख आहेत. मा. मुख्यलेखापरीक्षक हे मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये विधिनिर्मित अधिकारी आहेत. मुख्यलेखापरीक्षक हे उप मुख्य लेखापरीक्षक व सिनियर ऑडिटर यांचे मदतीने हिशेब तपासणीस यांचेवर नियंत्रण ठेवून मार्गदर्शन व चर्चा करुन लेखापरीक्षणाचे काम करुन घेतात .<br><br>मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४७,१०५,१०६ व शेडयुल चॅप्टर ३ चा प्रोव्हिजो २ मधील वैधानिक(स्टॅटयुटरी)तरतूदीनुसार या कार्यालयाकडून महानगरपालिका लेख्यांच्या हिशेबाचे पश्चात लेखापरीक्षण (पोस्ट ऑडिट) केले जाते. त्यानुसार हिशेब तपासणी अहवाल तसेच मुख्यलेखापरीक्षक कार्यालयाचा वार्षिक तपासणी अहवाल मा. स्थायी समितीस सादर केले जातात. |
| २. | महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे,परिषदा,समित्या व इतर निकष दर्शविणारे विवरणपत्र मग त्या मंडळाच्या,परिषदांच्या,समित्यांच्या व इतर निकायाच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत | इकडील कार्यालयास लागू नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका | सोबत **परिशिष्ट अ** |
| ४. | महापालिकेच्या कोणत्याही कामाकरता सवलती,परवानगी किंवा प्राधिकार पत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचें तपशील | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ५. | प्रत्येक तिमाही नंतर २ महिन्याच्या आत त्या तिमाहीचा लेखापरीक्षीत ताळेबंद जमा व खर्च आणि पैशाचा ओघ दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर ३ महिन्याच्या आत संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षीत वित्तीय विवरणपत्र | मा.मुख्य सभेच्या मान्यतेने खात्यामार्फत होणाऱ्या खर्चास दरवर्षी बजेट मध्ये तरतूद करण्यात येते.सदरच्या तरतूदीतून अधिकारी व सेवक यांचे वेतन खर्च केला जातो. मुख्य लेखापरीक्षक या कार्यालयाकडे इतर उत्पन्नाचे साधन नाही. |
| ६. | महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ७. | सर्व योजनांचे तपशील प्रस्तावित खर्च,पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवा साठी किंवा पार पडलेल्या कामासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ८. | महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवासाठीच्या किंवा पार पडलेल्या कामासाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमासाठीचे लाभार्थी निश्चीत करण्याची रीत व निकष | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ९. | महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबधीत बृहत योजनेचा शहर विकास योजनेच किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| १०. | राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करेल असे प्रमुख बांधकामाचे तपशील तसेच बांधकामाचे मूल्य,पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील या बाबतची माहिती | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ११. | महानगरपालिका निधीचा तपशील म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबी द्वारे मिळालेले उत्पन्न<br>(अ)कर,शुल्क,उपकर,अधिभार,मालमत्तेतून मिळणारे भाडे लायसन्स व परवानगी मिळणारी फी<br>(ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क,उपकर,अधिभार,मालमत्तेतून मिळणारे भाडे,लायसन्स व परवानगी यातून मिळणारी फी आणि वसूली न करण्याची कारणे.<br>(क) राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेला हिस्सआणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने,<br>(ख)महानगरपलिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे | इकडील कार्यालयास लागू नाही. |